स्वातंत्र्याचे उन्हाळे

लेखन: डैबरा वाइल्स

मराठी: अश्विनी बर्वे



पुस्तकाच्या बाबत

१९६०च्या दशकाच्या सुरुवातीला अमेरिकेच्या दक्षिणेकडच्या राज्यात काळे अमेरिकी लोक गोऱ्यासाठी असणाऱ्या सार्वजनिक नळ्यावर पाणी भरू शकत नव्हते, त्यांच्या शाळेत शिकू शकत नव्हते आणि सार्वजनिक ठिकाणांची मजा लुटू शकत नव्हते. तेव्हा १९६४ मध्ये नागरिक अधिकार कायदा पारित झाला, ज्यात म्हटले होते होते – "सर्व लोकांना सार्वजनिक ठिकाणांचा आनंद घेण्याचा पूर्ण समान अधिकार आहे.मग तो कोणत्याही वंशाचे, रंगाचे, धर्माचे किंवा राष्ट्रीय मूल्य असणारे असोत.

मी मोबिल, अलाबामामध्ये जन्मलेली एक गोरी मुलगी होते आणि उन्हाळ्यात आपल्या आवडत्या नातेवाईकांकडे मिसिसिपीला जात असे. जेव्हा नागरिक अधिकाराचा कायदा लागू झाला, तेव्हा पोहण्याचा तलाव बंद झाला. स्केटिंग रिंक आणि आइसक्रीमचे दुकान पण बंद झाले. काळ्यांना त्यांचा योग्य तो अधिकार आणि स्वातंत्र्य देण्याच्या विरोधात दक्षिणेकडच्या अनेकांनी आपले व्यवसाय बंद केले. काहींनी तर कायमस्वरूपी व्यवसाय बंद केले.

१९६४च्या उन्हाळ्यात नागरिक अधिकार कार्यकर्त्यांनी मिसिसिपिमध्ये एका 'फ्रीडम समर' कार्यक्रमाचे आयोजन केले, ज्यात काळ्या अमेरिकनांची मतदाता म्हणून नोंदणी केली जात होती. हा वांशिक हिंसा आणि बदलाचा काळ होता. याच उन्हाळ्यात मला पहिल्यांदा लक्षात आले की दुकानांमध्ये जाण्यासाठी काळ्या अमेरिकन लोकांना काळ्या दरवाज्यातून जावे लागे आणि त्यांना सेवा मिळण्यासाठी तोपर्यंत वाट पहावी लागे जोपर्यंतगोऱ्या लोकांचे काम होत नाही. त्यांच्याबरोबर वाईट वर्तणूक केली जाई. हे सगळे त्यांच्या कातडीच्या रंगामुळे, मग कायदा काही का म्हणेना. मला हे ही जाणवले की एखाद्या गोऱ्या माणसाचा काळा मित्र असणे किंवा काळ्याचा गोरा मित्र असणे धोकादायक होते. माझ्या डोक्यातून या गोष्टी आणि ही दृश्ये काढू शकत नव्हती आणि विचार करत होते की एखादे काळे मूल असणे कसे असेल? मी परिस्थिती बदलण्याचा विचार करत असे, पण त्याच बरोबर हा हि विचार करे कि एखादे मुल मग ते काळे असो कि गोरे,आपल्या स्तरावर शेवटी काय करू शकते?

ही कहाणी त्या काळातल्या माझ्या भावनांमधून उत्पन्न झाली आहे. कहाणी काल्पनिक असली तर सत्य घटनांवर आधारित आहे.



जॉन हैनरी वॉडल आणि माझ्यात घट्ट मैत्री आहे.

त्याची आई माझ्या आईकडे काम करते.

तिचे नाव एनी मे आहे.

दररोज सकाळी आठ वाजता एनी मे गावातून येणाऱ्या गाडीतून खाली उतरते.

आणि उंच पहाड चढून माझ्या घरापर्यंत येते.

जर उन्हाळा असेल तर जॉन हैनरी आपल्या आईच्या पाउलात पाऊल मिसळून तिच्या मागे-मागे येतो.





आम्हांला एनी मेला मदत करायला आवडे.

आम्ही वालाच्या शेंगाच्या कडा काढत असू. आम्ही आमच्या घरासमोरचे अंगण झाडत असू. आम्ही मांजरांना घरात घुसवत आणि परत त्यांना बाहेर हाकलत असू. जोपर्यंत एनी मे आम्हांला म्हणत नसे, “पळा, खूप झालं आता तुमचे चला बाहेर निघा, बाहेर खेळा.!” तोपर्यंत आमचा हा खेळ चालू असे.

आम्ही तोपर्यंत गोट्या खेळत असू जोपर्यंत आम्ही उन्हाने तापत नसू.

नंतर आम्ही ओरडत असू, “जो मागे राहील तो सडका अंडे आहे.!” असे म्हणत आम्ही सरळ पायवाटांनी, खडकाळ रस्त्याकडे धावत असू.





जॉन हैनरी माझ्या माहितीतला सगळ्यात चांगला पोहणारा आहे. तो कॅटफिशसारखा आवाज काढू शकतो आणि दलदलीतल्या राक्षसासारखा बुडबुडे सोडतो. तो माझ्या बरोबर गल्लीतल्या तरण तलावात पोहत नाही. तिथे पोहण्याची त्याला परवानगी नाही.

म्हणून आम्ही संकरी खाडीवर दगड आणि लाकडाचा बांध घालतो आणि म्हणजे मग आम्ही दोघे तिथे एकत्र पोहू शकतो. मग तिथे ओरडत नंग्याने थांबलेल्या पाण्यात आम्ही उडी घेतो.



जॉन हैनरीच्या कातडीचा रंग जळलेल्या लोण्यासारखा भुरा आहे.

त्याच्या शरीराचा सुगंध चांगल्या पावसानंतर देवदारच्या भिजलेल्या पानांसारखा सुगंधित आहे.

माझ्या कातडीचा रंग गर्द किटक पतंगासारखा आहे, जे रात्री अंगणात जळणाऱ्या दिव्यांच्या जवळ नाचतात.

जॉन हैनरी म्हणतो की माझ्यातून ताज्या धुतलेल्या मोज्यांसारखा वास येतो.

“याचा अर्थ गंज!” मी ओरडतो.

आम्ही पाण्यात अशा प्रकारे उडी मारतो की त्याचे रुपांतर पांढऱ्या तुफानात होते आणि एवढे हसतो की आमचे पोट दुखू लागते.

तेव्हा आम्ही पाठीवर तरंगतो आणि व्हेल माशासारखे फव्वारे सोडतो.

“मी मोठा झाल्यावर आग विझवणारा होणार आहे,” मी म्हणतो.

“मी पण,” जॉन हैनरी म्हणतो.





माझ्या खिशांत पाच सेंटचे नाणे होते म्हणून आम्ही पोहून झाल्यावर, कपडे घातल्यावर बाजाराकडे चालत गेलो.

जॉन हैनरी मिस्टर मेसनच्या किराणा दुकानाच्या समोरच्या दरवाज्यातून आत येत नाही.

त्याला तशी परवानगी नाही.

''कसा आहेस लहानग्या जो? मिस्टर मेसन विचारतात. हे विचारतांना ते डोळा मारतात.

''हे तू एकटाच खाणार का?"

माझ्या ह्रदयात धाकधूक होत होती.

"नाही, एक माझ्या मित्रासाठी आहे," इतके म्हणून दरवाज्याच्या बाहेर पळालो.

"हो तर, बाहेर खूप गरमी आहे." मिस्टर मेसन मागून म्हणाले.

''मला आइस पॉप (पाणीवाले आइसक्रीम) खूप आवडते!" जॉन हैनरी म्हणाला.

''मला पण," मी म्हणालो.



एनी मे रोज संध्याकाळी माझ्या कुटुंबांसाठी रात्रीचा स्वयंपाक करते.

ती मक्याच्या पीठात क्रीम मिसळते आणि मकाची बिस्किटे तयार करत असे.

डॅडी त्यांचा बर्फ घातलेला चहा हलवत म्हणतात,

''उद्या पासून बाजारातला तरणतलाव सगळ्यांसाठी उघडणार आहे, मग ती व्यक्ती कोणत्याही रंगाची असो.''

''हा नवीन कायदा आहे,'' आई मला समजावत म्हणाली.

ती माझ्या ताटात मटार वाढत म्हणाली, ''आता सगळीकडे असे होईल - सगळे काही एकमेकांच्या बरोबर. खाण्याच्या जागी,शौचालयामध्ये, पिण्याच्या पाण्याच्या नळावर पण.''

मी खुर्चीमध्ये एका किड्यासारखा लटपटतो.

''मला थोड्यावेळ द्या,'' असे म्हणून मी जोरात स्वयंपाक घरातून धावत गेलो, हि बातमी मला जॉन हैनरीला सांगायची होती.



“मी बाजारातल्या तलावात पोहू शकेल,” तो ओरडत म्हणाला, “तो खूप खोल आहे का?”

“खूपच खोल,” मी म्हटले. “आणि पाणी बिलकुल स्वच्छ आहे. तू उडी मारून त्याच्या तळापर्यंत जा आणि डोळे उघडून बघ.”

“उद्या आपण तिथे सगळ्यांच्या आधी पोहचू,” जॉन हैनरी उत्साहात म्हणाला.

“मी माझे भाग्यशाली नाणे घेऊन येतो आणि मग आपण ते काढण्यासाठी उड्या मारू.”





दुसऱ्या दिवशी सूर्य उगवत नाही तोच, माझा खरा मित्र जॉन हैनरी दिसला.

तो धावत पळत माझ्याकडे आला.

''चल निघायचं!" तो ओरडत म्हणाला. "मी माझे नाणे घेऊन आलो आहे, "मग मी त्याच्याबरोबर धावत गेलो.

आम्ही बाजारातल्या तरण तलावापर्यंत धावत गेलो.

आम्ही शेवटच्या डोंगरावरून एक दुसऱ्याच्या पुढे जाण्याची चढाओढ लावली ... आणि मध्येच थांबलो.



काउंटीच्या अनेक कचरा गाड्या तिथे उभ्या होत्या.

त्या तलावापर्यंत जात आणि परत फिरून येत.

मज़दूर गरम डांबर त्या तलावात टाकत होते, जिथे पूर्वी चमकणारे स्वच्छ पाणी होते.

त्या मज़दूरामध्ये जॉन हैनरीचा मोठा भाऊ विल रॉजर्स पण होता.

आम्ही त्याला हाका मारत होतो, “काय झालं?” हे त्याला विचारायचे होते.

पण त्याआधीच त्याने आम्हांला पहिले आणि रस्त्याकडे जाण्याचा इशारा केला.याचा अर्थ होता, “घरी परत जा.”





पण आमचे पाय तर जमिनीला चिटकून गेले, आम्ही हलूच शकलो नाही.

मग आम्ही उंच-लांब झुडपांच्या मागे लपून तिकडे काय चालू आहे हे बघत राहिलो. जोपर्यंत तलाव गरम डांबराने भरत नाही.

शश्श्श्शश्शश! धुराने भरलेली वाफ वर उठत होती.

मज़दूरांनी आपल्या बुटांवर लाकडाची पट्टी बांधलेली होती आणि त्याच्या साहय्याने ते डांबर एकसारखे करत होते.

विल रॉजर्स एका रिकाम्या ट्रकच्या मागे आपले फावडे धरून, आपल्या साथीदारांबरोबर ट्रक मध्ये चढत होता.

त्याचा चेहरा तूफ़ानी ढगासारखा दिसत होता.

माझ्या लक्षात आले की या कामामुळे तो खूप नाराज झाला आहे.

"चला!" त्याचा बॉस ओरडला आणि ट्रक खडखड करत रस्त्याने जाऊ लागला.



आता चारी बाजूला एवढी शांतता पसरली होती की तुम्ही घासात फिरणाऱ्या हवेचा आवाज ऐकू येत होता.

आम्ही दोघे तलावात उड्या मारण्याच्या फळीवर जाऊन बसलो.

आणि शिडीच्या वरचा रुपेरी भाग बघत राहिलो जो डांबराच्या बाहेर होता.

माझे हृदय जोरात धडधड करत होते.

जॉन हैनरीचा आवाज़ थरथरत होता.

''गोरे लोकांना काळ्या लोकांनी आपल्या तलावात पोहावे असे वाटत नाही.”

''तू चुकीचा आहेस जॉन हैनरी,'' मी म्हणालो,पण मला माहीत होते तेच खरे आहे.

''चल आपण फिडलर्स् क्रीकवर जाऊ या,” मी सुचवले. “तसेही मला या तलावात पोहण्याची इच्छा नव्हतीच.”



जॉन हैनरीच्या डोळ्यात रागाचे अश्रू आले.

''मला वाटत होते,'' तो म्हणाला, "मला या तलावात पोहण्याची इच्छा होती. मला ते सगळे करायचे होते जे तू करू शकतो.

मी काय म्हणू यावर? मला काही सूचन नाही.

माझ्या डोक्यात नवीन विचारांची किलबिल होत होती.

मला जॉन हैनरीच्या बरोबर डेयरी डिप (आइसक्रीमचे दुकान) मध्ये जावे वाटत होते, आणि त्याच्याबरोबर आईसक्रिम खावे वाटत होते.

मला वाटत होते की आम्ही फिल्म बघायला जावे आणि पॉप-कॉर्न खरेदी करावे आणि ते खात खात फिल्म बघावी.

मला बाजार जॉन हैनरीच्या डोळ्यांनी बघायचा होता.





हम मिस्टर मेसनच्या दुकानासमोर थांबलो.

मी माझे हात खिशात घातले आणि माझ्या डोक्यात ते शब्द शोधत होतो ज्यांच्या आधारे मी आपले नवीन विचार सांगू शकेल.

माझ्या बोटांना दोन नाणी लागतात.

''आइस-पॉप पाहिजे?''

जॉन हैनरी आपले डोळे पुसतो आणि दीर्घ श्वास घेतो.

''पण माझा मी निवदेन" मी थुंकी गिळतो आणि माझे मन हो म्हणते.

"तर चल असेच करू या," मी म्हणालो.

मी माझे नाणे काढून जॉन हैनरीला देवू लागलो तर त्याने मान हलवून नकार दिला, "माझ्याजवळ नाणे आहे."

आम्ही एकदुसऱ्याकडे बघू लागलो.



तेव्हा आम्ही दोघे दुकानाच्या समोरच्या दारातून बरोबर आत गेलो.

डैबरा वाइल्स अलाबामा मध्ये जन्म झाला आणि एका अशा वायुसेना परिवारात वाढली,ज्यांची सतत बदली होत असे. पण मिसिसिपीमध्ये स्थायिक असणाऱ्या आपल्या कुटुंबाशी त्यांचे खोल नाते आहे. त्या आजही फ्रैडरिक, मेरीलैण्डच्या आपल्या घरी खाली दक्षिणेत जातात. त्या स्वतंत्र लेखन करतात आणि कार्यशाळेत लेखन आणि मौखिक इतिहास शिकवतात. त्या मुलांना सांगतात की इतिहास खरेतर जीवन असते आणि प्रत्येक माणसाची जीवनकहाणी महत्वपूर्ण असते. ही त्यांचे पहिले पुस्तक आहे.

जैरोम लगारिग एक कलाकारांच्या परिवारात जन्माला आले आणि मोठे झाले. त्यांनी निकी ग्राइम्सचे प्रसिद्ध पुस्तक *माय मैन ब्लू* चित्रित केले आहे. त्यांच्या कार्याचा उल्लेख *न्यू यॉर्क टाइम्स् बुक रिव्यू मध्ये केला गेला आहे. वर्तमानात* पार्सन्स स्कूल ऑफ डिज़ाइनमध्ये चित्रकला शिकवतात.ते ब्रुकलिन, न्यूयॉर्कमध्ये राहतात.

।जॉन हैनरी माझ्या माहितीतला सगळ्यात चांगला पोहणारा आहे. तो कॅटफिश सारखा आवाज काढू शकतो आणि दलदलीतल्या राक्षसासारखा बुडबुडे सोडतो. तो माझ्या बरोबर गल्लीतल्या तरण तलावात पोहत नाही. तिथे पोहण्याची त्याला परवानगी नाही.



जो आणि जॉन हैनरीमध्ये खूप समान गोष्टी आहेत. दोघांना गोट्या खेळायला आवडतात, दोघांना मोठे झाल्यावर अग्नीशामक दलात सामील व्हायचे आहे, आणि दोघांना पोहायला आवडते. पण एका गोष्टीत दोघांमध्ये फरक आहे. जो गोरा आहे आणि जॉन हैनरी काळा. १९६४च्याकाळात दक्षिणेकडच्या भागात जॉन हैनरी ते सगळे करू शकत नव्हतो जे त्याचा खरा मित्र करू शकत होता. तेव्हा एक नवीन कायदा आला ज्यात अशा प्रकारच्या भेदभाव करण्याला बंदी घालण्यात आली होती. आणि त्यामुळे बाजारातला पोहण्याचा तलाव सगळ्यांसाठी खुला करण्यात आला. जो आणि जॉन हैनरी खूप उत्साहात होते. ते एक दुसऱ्याशी शर्यत लावत धावत तलावावर पोहचले..पण त्यांच्या लक्षात आले की लोकांचे हृदय आणि विचार बदलण्यासाठी फक्त कायद्याची नाही तर त्यापेक्षा अधिक काही लागते.